(१४७)

२०८८-०९

कायम विना अनुदान
जून-०५ पासून इ. ८ वी/इंग्रजी माध्यम

जा.क्र. माध्य-३(९२)/नमाशा/मान्यता/पुवि/२००८-०९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 17 FEB 2009

प्रति,

सचिव,

निनादेवी शिक्षण संस्था,

पुणे-४६.

**विषय : सन २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत . . .**

**संदर्भ :** १) शासन पत्र क्रमांक-नमाशा/२००६/(१५८/२००६)माशि-१, दि. १६/५/२००६ ~~व दि.~~

२) या कार्यालयाचे पत्र क्र.माध्य.३/१४/नमाशा/पुवि/२००६, दि.७/६/२००६ व दि.१५/६/२००६.

३) शासनपत्र क्रमांक-नमाशा/२००६(४५७/२००६)माशि-१, दि.१८/७/२००६.

४) या कार्यालयाचे पत्र क्रमांक-माध्य-३/१४/नमाशा/रद्द/पुवि/२००६, दि.३१/७/२००६.

५) शासनपत्र क्रमांक-न्यायाप्र/२००८(१९२/२००८)माशि-१, दि.१७/३/२००८.

६) या कार्यालयाचे समक्रमांक पत्र दि.२२/४/२००७ व २७/५/२००८.

७) या कार्यालयाचे पत्र दि.१६/६/२००८.

८) शासनपत्र क्रमांक माशानू-२००८/(५९४/०८)माशि-१, दि.७/७/२००८.

९) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प., पुणे यांचे पत्र क्रमांक- शिक्षण/माध्य-९/१२७६/०८/दि. १/१०/०८ व शिक्षण/माध्य-९/१९३१/०८ दि. २२/१२/०८

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन खाली दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून २००५ पासून कायम विनाअनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | निनादेवी शिक्षण संस्था, पुणे-४६ | धनकवडी, पुणे | आठवी | इंग्रजी |

**कायम विना अनुदान**

१. आपल्या संस्थेची वरती नमूद केलेल्या नवीन माध्यमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूरी देण्यांत आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही स्वरुपाची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

२. शासनाच्या पूर्व परवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३. 'कायम विना अनुदान तत्वावर मिळालेली शाळा' असा फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा पध्दतीने लावणे हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे .

४. सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने / शाळेने संबंधित अधिकारी यांचेशी/शासनाशी पत्रव्यवहार करतांना 'कायम विनाअनुदानित शाळा' अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

५. सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६. सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

७. इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी (ई.बी.सी.) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यांत यावे.

८. जादा उपडण्यांत आलेल्या तुकड्यातून झाल्याने पाठविलेले प्रवेश प्राध्यान्याने देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यांत येवू नये.

९. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यांत येवू नये...

१०. माध्यमिक शाळा संहिता व खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यांत येईल

११. शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन २१०३/(५०/०३) माशि-२, दिनांक २७ मे, २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.

President
Late Uddhavrao Tulshiram Jadhavar Foundation, Indraprasth, Krantinagar, Wadgaon Bk., Pune-41

namasha stancil

१२. संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यांत येईल.
१३. शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मंजूर करुन देण्यांत येईल.
१४. माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यांत येईल.
१५. शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इत्यादी बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यांत येतील.
१६. माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये कार्यबळ गट समिती सभेच्या पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.
१७. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२ (१७) अन्वये शाळेत पालक-शिक्षक संघाची स्थापना सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.

इतर अटी –

१. संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखादी शाळेची मान्यता काढून घेतली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. सदर संस्थांमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

वरील बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यांत येईल.

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३, १ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्वाक्षरीत शिक्षण उपसंचालक
यांची स्वाक्षरी आहे.

(बि.ज्ञा.सोनवणे ?) शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता.

प्रतिलिपी

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही करिता अग्रेषित.

त्यांना वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पुर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा. तसेच संस्थांविरुध्द तक्रारी व गैरव्यवहारांची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्याविषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणा-या अधिकां-यांकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

१. मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२
२. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना सविनय सादर
३. निवडनस्ती

President
Late Uddhavrao Tulshiram Jadhavar
Foundation, Indraprasth, Krantinagar,
Wadgaon Bk., Pune-41